**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2021, VOL- 9/67*

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 - शिक्षक शिक्षणास सर्वांगीण व दिशादर्शक बदलास संधी

**डॉ अरुणा राजाराम भांबरे**
*प्रभारी प्राचार्य श्री समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च( बी.एड) म्हसणे फाटा पारनेर अहमदनगर.*

**Paper Received On:** 21 OCT 2021
**Peer Reviewed On:** 31 OCT 2021
**Published On:** 1 NOV 2021

**Abstract**

*नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** अन्वये शैक्षणिक प्रकियेमध्ये, धोरणांमध्ये, प्रशासकीय व्यवस्थांमध्ये अनेक नवनवीन संकल्पनात्मक सुधारणा व आमूलाग्र बदल नमूद करण्यात आलेले आहेत. **21** शतकातील शाश्वत व निरंतर विकास ध्येये प्राप्त करणे शक्य होईल अशी समर्थ, सशक्त आणि प्रगतशील शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उदि्दष्ट आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणान्वये शैक्षणिक व्यवस्था व शैक्षणिक संस्था यांच्यासाठी मूलभूत तत्वे (Fundamental Principles) निश्चित करण्यात आलेली दिसून येतात. भारतीय मूल्ये जोपासून अभ्यासकम व अध्ययन अध्यापन प्रकिया या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये मूलभूत कर्तव्ये आणि सांविधानिक मूल्ये प्रभावीपणे रूजविणे हे या धोरणातून स्पष्ट करण्यात आलेले आहे. आपला भारत हा जागतिक ज्ञान अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असून आजचा युवक उद्याचा नागरिक म्हणून जीवन जगत असताना त्याच्या आकांक्षा शिक्षण प्रकियेतून पूर्ण करणे कमप्राप्त आहे.प्रस्तुत संशोधन हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** - शिक्षक शिक्षणास सर्वांगीण व दिशादर्शक बदल विषयक असून यामध्ये पुढील संशोधन उदि्दष्टांचा अभ्यास केलेला आहे. उदि्दष्ट **1.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** आणि सर्वांगीण शिक्षणास संधी अभ्यासणे. **2.** शिक्षक शिक्षण विषयक सर्वांगीण शिक्षणासाठी समता आणि न्याय विषयक दृष्टीकोन अभ्यासणे. **3.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** आणि शिक्षक शिक्षण यांचा संबंध अभ्यासणे. **4.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** व शिक्षक शिक्षणास होणारे फायदे अभ्यासणे. प्रस्तुत संशोधनात विविध संदर्भ स्त्रोतांचा अभ्यास केलेला असून यामध्ये संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिके, पूर्व संशोधन कार्य यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. सदर संशोधन कार्य प्राथमिक शालेय स्तरावर अभ्यासलेले आहे.*

***गुज शब्द:*** *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020**, शिक्षक शिक्षण, सर्वांगीण व दिशादर्शक बदल*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**प्रस्तावनाः**

**21** शतकातील शाश्वत व निरंतर विकास ध्येये प्राप्त करणे शक्य होईल अशी समर्थ, सशक्त आणि प्रगतशील शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे . नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये 'जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम' समाविष्ट असून 'सर्वांसाठी समावेशक' आणि 'समान गुणवत्तेचे शिक्षण' आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययन शिक्षणाची संधींना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट **2030** पर्यंत पूर्ण करण्याबाबत ऊहापोह केलेला आहे .

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि सर्वांगीण शिक्षणास संधीः**

- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैशिष्टपूर्ण क्षमतांचा शोध घेणे, ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे यावर भर देणारा आहे .
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक आणि पालकांनी अभ्यास व अभ्यासेतर बाबींवर चालना व प्रोत्साहन द्यावे अशा संधी निर्माण करण्यास उपयुक्त आहे .
- प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या संकल्पनांना इयत्ता तिसरी पर्यंत प्राधान्य देणे आवश्यक आहे .
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रमात लवचिकतेवर भर देण्यात आलेला आहे . यामध्ये प्रामुख्याने अध्ययनाचा मार्ग आणि कार्यक्रम निवडण्याची मुभा देण्यात आलेली आहे, म्हणजेच विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शिक्षण (Need Based Education) आणि आवडीनुसार शिक्षण की जे आयुष्यातील मार्ग निवडण्यास उपयुक्त असणार आहे, अशा सर्वांगीण बाबींवर भर देण्यात आलेला दिसून येतो .
- कला आणि विज्ञान, अभ्यास आणि अभ्यासेतर उपक्रम, व्यावसायिक आणि नवनवीन शैक्षणिक प्रवाह यांमध्ये एक वाक्यता असावी आणि ज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये अधिक वृध्दींगतता होण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक असल्याचे प्रभावीपणे नमूद करण्यात आलेले आहे .
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करून एका बहुआयामी जगासाठी विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानसशास्त्रे आणि खेळ यांच्यामध्ये बहु-शाखीय (Multi-Disciplinary) आणि सर्वसमावेशक शिक्षणाचा (Inclusion Education) विकास यावर भर देण्यात आल्याचे दिसून येते .

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पाठांतर व परीक्षा या व्यतिरिक्त आशयात्मक संकल्पना समजून घेण्यावर भर देण्यात आलेला आहे .
- तार्किक विचारशक्तीला चालना देण्यासाठी व समस्या निराकरणातून नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देण्यासाठी कल्पकतेस संधी देण्यावर भर देण्यात आलेला आहे .
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नैतिकता आणि मानवी व घटनात्मक मूल्ये उदा . सहकार्य, इतरांबाबत आदर, सौजन्यशीलता, सार्वजनिक मालमत्तेबाबत आदर, वैज्ञानिक दृष्टीकोन, लोकशाहीची भावना, जबाबदारी या बाबी रूजविण्यासाठी प्राधान्य देण्यात आल्याचे दिसून येते .

**शिक्षक शिक्षण विषयक सर्वांगीण शिक्षणासाठी समता आणि न्याय विषयक दृष्टीकोनः**

- अध्यापन आणि अध्ययनात बहु भाषिकत्व आणि भाषा शक्ती यांना प्रोत्साहन देण्यात आलेले आहे .
- संवाद, सहकार्य, सामूहिक कार्य आणि लवचिकता अशी जीवन मूल्ये रूजविण्यावर भर देण्यात आलेला आहे .
- सातत्यपूर्ण मूल्यांकनावर भर व अध्यापन आणि अध्ययनात तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करण्यावर भर दिसून येतो .
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ बनवण्यासाठी शैक्षणिक नियोजन आणि व्यवस्थापनावर भर देण्यात आलेला आहे .
- शिक्षण ही सातत्यपूर्ण प्रकिया असून सर्व अभ्यासकम, अध्यापन-अध्ययन प्रकिया आणि मूल्यांकन यामध्ये विविधता व नाविन्यपूर्ण यावर भर देण्यात आलेला आहे .
- सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये पूर्ण समानता आणि सर्वसमावेशकता यावर भर देण्यात आलेला आहे .
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शिक्षणासाठी प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि पायाभूत शिक्षणापासून ते शालेय शिक्षण व उच्च शिक्षणापर्यंत सर्व पातळयांवरील शिक्षणाच्या अभ्यासकमात सुसूत्रता आणण्यावर भर देण्यात आलेला आहे .
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शिक्षणासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विकासासाठी सहआवश्यकता म्हणून उत्कृष्ट दर्जाचे संशोधन यावर भर देण्यात आल्याचे दिसून येते .


Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या भारतीय परंपरेचा, भारताच्या समृध्द, वैविध्यपूर्ण, प्राचीन आणि आधुनिक संस्कृती, ज्ञान व्यवस्था यांचा अभिमान असणे आवश्यक आहे, यावर भर देण्यात आल्याचे दिसून येते .
- शिक्षण ही एक निरंतर आणि सार्वजनिक सेवा आहे . गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध असणे हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क असून त्याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण साधण्यावर भर देण्यात आलेला आहे .

वरील बाबींचा विचार करता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शिक्षणास संधी निर्माण करणारे असून यातून भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविण्यास उपयुक्त ठरणार आहे .

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि शिक्षक शिक्षण:**

- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** अंतर्गत शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत आमुलाग्र बदल करण्यात आले आहेत . शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळया शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे . याचाच सोपा अर्थ असा आहे की, विद्यार्थ्यांना आता एकाचवेळी अभियांत्रिकी व संगीत कला हे दोन्ही विषय घेऊन उच्च शिक्षण पुर्ण करण्याची संधी मिळणार आहे .




***राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि शिक्षक शिक्षण***

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बहुशाखीय शिक्षणास चालना देण्यासाठी शिक्षणाची संपूर्ण उपलब्धता, समानता आणि सर्वसमावेशकता सुनिश्चित करण्यासाठी व कमी शैक्षणिक सुविधा असलेल्या प्रदेशात अधिक उच्च शिक्षण संस्था स्थापित व विकसित करण्यावर भर देण्यात आलेला आहे .
- प्रस्तुत धोरणात व्यापक आधारभूत, बहुशाखीय, लवचिक अभ्यासक्रमासह सर्वसमावेशक पदवी शिक्षण अभ्यासक्रम, विषयांचे सर्जनशील संयोजन, व्यावसायिक शिक्षणाचे एकात्मीकरण आणि योग्य प्रमाणीकरणासह बहुशाखीय शिक्षणाची संधी निर्माण केलेली दिसून येते .
- बहुशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठांची स्थापना ही आयआयटी, आयआयएमच्या तोडीची देशातील जागतिक दर्जाच्या सर्वोत्कृष्ट बहुशाखीय शिक्षणासाठी आदर्शवत म्हणून स्थापित करण्यास संधी देणारा आहे .
- राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानची (NRF) स्थापना करून व क्रेडिट आधारित प्रणाली सदर करून सर्वो च्च संस्थेच्या माध्यमातून प्रबळ संशोधन संस्कृती व नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी उच्च शिक्षणामध्ये संशोधन क्षमता वृध्दींगत करण्यास प्राधान्य देण्यात आलेले आहे .

वरील बाबींचा विचार करता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** ची चौकट सर्वांगीण व बहुशाखीय शिक्षणास प्रभावी आणि न्याय्य शिक्षणासाठी लवचिक आणि तंत्रज्ञान सक्षम दृष्टीकोनाला चालना देऊन भारतातील शिक्षणामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी उपयुक्त आहे . शिक्षणातील गुणवत्ता, संशोधन आणि नवोपक्रम, विद्यार्थ्यांना आवडीनुसार पदवी मिळविण्यास संधी या बाबींवर लक्ष देण्यात आलेले आहे . विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि वेगाने बदलणा-या जगात यशस्वी होण्यासाठी त्यांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान प्रदान करणे हेच धोरणात नमूद करण्यात आलेले आहे .

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व शिक्षक शिक्षणास होणारे फायदे:**

**फायदे:**

शैक्षणिक कार्यक्रमाचा एक पैलू म्हणजे शिक्षक . विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन अपेक्षित बोधात्मक व भावात्मक वर्तन बदल घडवून आणण्यामध्ये शिक्षकाची भूमिका व स्थान फार महत्त्वाचे आहे .

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षक शिक्षणाची भूमिका महत्वाची आहे . कारण शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहे .

Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**फायदे :**

- नाविन्याचा शोध घेऊन संशोधन वृत्ती जोपासण्यास मदत
- अध्ययनकर्त्यास प्रेरणा व प्रोत्साहन देण्यास मदत
- वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यास उपयुक्त
- विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा शोध आणि विकासास चालना
- विचारशक्ती आणि चिकित्सक वृत्तीस चालना
- सृजनशील प्रक्रियेस चालना
- सामाजिक आणि मूल्यावर्धित कौशल्य विकसित करण्यास मदत
- गुणवत्तापूर्वक मूल्यमापन करण्यास उपयुक्त

शिक्षण म्हणजे सर्वांग सुंदर जीवन घडविणारी प्रकिया होय. शिक्षक हा शिक्षण प्रकियेचा प्रमुख घटक असल्याने शिक्षकाने विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षण दिशादर्शकपणे रूजविणे आवश्यक आहे, यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांची परस्पर आंतरकिया महत्वाची आहे .

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 शिक्षक शिक्षणास होणारे तोटे:**

- ✓ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** हे **21** व्या शतकातील पहिले सर्वात महत्वाचे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल करणारे धोरण आहे .
- ✓ वास्तविक पाहता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **2020** ची अंमलबजावणी कार्य नुकतेच सुरू होत असल्याने याबाबतचे तोटे सांगणे कठीण आहे .
- ✓ संशोधकास याबाबत सखोल अभ्यास केल्यानंतर व धोरणाची अंमलबजावणीनंतर निश्चित असे सांगता येईल .

Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**संदर्भ :**

*भिंताडे वि . रा ., 1999* ***शैक्षणिक संशोधन पध्दती,*** *पुणे नुतन प्रकाशन .*

*मुळे रा ., 2011* ***शैक्षणिक संशोधनाची ओळख,*** *नाशिक इनसाईट प्रकाशन .*

*जगताप ह . ना , 2009* ***शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*कदम चा . प ., 2007* ***शैक्षणिक संख्याशास्त्र,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*पंडित ब . वि ., 2010* ***शिक्षणातील संशोधन,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*दांडेकर वा . ना ., 2004* ***शैक्षणिक संख्याशास्त्र व मूल्यमापान,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*करंदीकर सु ., 2006* ***शैक्षणिक मानसशास्त्र*** *कोल्हापूर, फडके प्रकाशन .*

*भांडारकर के ., 2005* ***सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र,*** *पुणे नित्यनूतन प्रकाशन .*

*साखरे स . ज . 2023, भारतीय शिक्षण, मुंबई*

*Best J.W & Khan J.V (2011)* ***Research in Education*** *(10th Edition) Published by PHI Leaving Private Limited New Delhi- 110001*

*National Education Policy 2020*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*